# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/02/2024 (गुरूवार) सकाळ


---

### रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक
### नागपूर ग्रामीण विशेष पथकाची कारवाई

मा. पोलीस अधीक्षक सा. यांचे विशेष पथक नागपूर ग्रामीण हे पोलीस ठाणे मौदा हद्दीत गस्त करीत असता, दिनांक १५/०२/२०२४ रोजी पहाटे ०३.५० वा. सुमारास गोपनीय सुत्रधाराकडुन माहीती मिळाली की, एका मागे एक मोठ्या एलपी १२ चक्का वाहनामध्ये अवैधरित्या विनापरवाना रेती लोड असुन, भंडारा कडुन मौदा–नागपुर मार्गे वाहतुक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून विशेष पथकने मौजा मौदा येथील कन्हान नदीचे पुलावर अवैध रेती सबंधाने अचानक नाकाबंदी करून संशयीत १२ चक्का एलपी चेक करीत असता सदर वाहनाची पाहणी केली असता १) एक पांढरा व ऑरेंज रंगाची टाटा कंपनीची १२ चक्का एलपी क्र. एम.एच–२७/बी.एफ–२१२१ २) एक पांढरा व ब्राउन रंगाचा टाटा कंपनीची १२ चक्का एलपी क्र. एम.एच–२७/बी.एक्स– ८५९७ मध्ये प्रत्येकी अंदाजे १२ ब्रास रेती असे एकुण २४ ब्रास रेती वाहतुक करतांना मिळुन आले. **आरोपी १) शाहरूख खान शाकीर खान, वय ३१ वर्ष, रा. गुलीस्तानगर लमील कॉंलनी अमरावती २) आबीदखान सुभान खान, वय ३५ वर्ष, रा. अलीमनगर कब्रस्थान जवळ अमरावती ३) ईरफान शाह अब्दुल्ला शाह, वय ३२ वर्ष, रा. रहेमदनगर जामा मस्जीद जवळ अमरावती ४) मोहम्मद जुबेर शेख नुरूल, वय ३२ वर्ष, रा. अंसार नगर सुन्नी मस्जीदजवळ अमरावती ५) सोहेल अहमद अब्दुल सत्तार, रा. गुलीस्ता शाळा जवळ फरीद कॉंलनी मोर्शी अमरावती, पाहीजे आरोपी ६) अलीम उर्फ लालाभाई माले खान, वय ४० वर्ष, रा. बलगाव रोड काटा अमरावती** यांचे ताब्यातून व प्रत्येकी अंदाजे १२ ब्रास रेती असे एकुण २४ ब्रास रेती, नगदी पैसे व मोबाईल असा एकुण ४१,६४,६१०/–रूपयाचा मुद्येमाल जप्त करण्यात आला.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक अमित पांडे, पोहवा ललीत उईके, पोलीस नायक प्रणय बनाफर, पोलीस अंमलदार कार्तिक पुरी, बालाजी बारगुले विशेष पथक नागपूर ग्रामीण यांनी पार पाडली.

## पोस्टे नरखेड हद्दीत अवैधरित्या मोहफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमांवर कायदेशिर कार्यवाही

मा. पोलीस अधिक्षक साहेब नागपुर जिल्हा नागपुर ग्रामिण याचे आदेशाने दि. १४/०२/२०२४ रोजी देवळी नरखेड, मौजा नरखेड टाउन, पिठोरी नरखेड येथे मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या इसमांवर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारे एकुण ०३ आरोपी हे मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिंग भट्टी काढताना मिळुन आले. आरोपीचे ताब्यातून मोहाफुल दारूने एकुण ४९ लिटर मोहाफुल गावठी दारू प्रति लिटर ५०/— रू प्रमाणे एकुण २४५०/— रू चा मुद्देमाल मिळून आल्याने नष्ट करण्यात आला. **आरोपी नामे— शालीकराम श्रीराम चक्रपाणी, वय ४२ वर्ष, रा. देवळी ता. नरखेड २) विजय सुरेश अरखेल, वय ४० वर्ष, रा. वार्ड क्र. १२ नरखेड ३) निलेश भाउराव उईके, वय ३० वर्ष, रा. पिठोरी ता. नरखेड** यांचे विरुद्ध पो.स्टे नरखेड येथे कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोस्टे नरखेड ठाणेदार सपोनि कृष्णा तिवारी, पोहवा गजानन तितरे, पोशि जालिंदर राठोड, सफौ सनेश्वर, पोशि दिनेश हिवसे, दिनेश कुमेरीया, पोहवा भुजंग बन्सोड, अक्षय ठाकरे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर